॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि.२५ (      ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जळगाव जिल्हयातील एरंडोल विभागाचा युवक महोत्सव सोमवार, दि.२८ जानेवारी बी.पी.कला, एस.एम.ए.विज्ञान व के.के.सी.वाणिज्य महाविद्यालय, चाळीसगाव येथे होत आहे.

गतवर्षापासून जिल्हा युवक महोत्सव सुरु झाले आहे. जळगाव जिल्हयाचे एरंडोल आणि जळगाव असे दोन विभाग करण्यात आले असून एरंडोल विभागाचा महोत्सव सोमवारी होत आहे. या विभागातील एरंडोल, जामनेर, पाचोरा, भडगाव, चाळीसगाव, पारोळा, अमळनेर, चोपडा आणि धरणगाव येथील महाविद्यालयांचा समावेश असणार आहे. सोमवारी होणाऱ्या या जिल्हा महोत्सवात २१ महाविद्यालयातील ४५६ कलावंत सहभागी होत आहेत. नृत्य, साहित्य कला, नाटय, संगीत आणि ललित कला या पाच प्रमुख कला प्रकारातील २४ उपकला प्रकारांच्या स्पर्धा होणार आहेत.

सोमवारी, सकाळी ८.३० वाजता या महोत्सवाचे उद्‌घाटन आमदार तथा सिनेट सदस्य उन्मेष पाटील यांच्या हस्ते होणार आहे. स्वागताध्यक्ष कुलसचिव भ.भा.पाटील आहेत. यावेळी आमदार सतिष पाटील, आमदार स्मिताताई वाघ, व्य.प.सदस्य तथा युवारंगचे कार्याध्यक्ष दिलीपदादा पाटील, सहसंचालक डॉ.प्रशांत मगर, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.एस.टी.इंगळे, प्राचार्य डॉ.एल.पी.देशमुख, प्राचार्य डॉ.डी.एस.सुर्यवंशी, प्रा.नितीन बारी, प्रा.मोहन पावरा, डॉ.सुभाष चौधरी, दीपक पाटील, विवेक लोहार, डॉ.जे.बी.नाईक, डॉ.प्रिती अग्रवाल हे विशेष अतिथी राहणार असून सिनेट सदस्य पोपट भोळे, अमोल पाटील, ॲड.संदीप पाटील, पुनम गुजराथी, दिनेश नाईक, नितीन झाल्टे, अधिष्ठाता डॉ.डी.आर.पाटील, प्राचार्य डॉ.पी.पी.छाजेड, प्राचार्य डॉ.प्रमोद पवार, डॉ.लता मोरे तसेच प्रा.विलास चव्हाण, प्रा.राम पेटारे, प्राचार्य एन.एन.गायकवाड, प्राचार्य एस.आर.जाधव, प्राचार्य डी.एस.निकुंभ, डॉ.प्रकाश लोहार, डॉ.डी.एन.वाघ, प्रा.शशिंकात बऱ्हाटे, प्रा.विनोद रायपूरे हे अतिथी म्हणून उपस्थित असतील अशी माहिती प्राचार्य डॉ.मिलींद बिल्दीकर, डॉ.प्रकाश बाविस्कर, सलीलकुमारी मुठाणे, प्रा.अजय काटे, समन्वयक डॉ.पंकजकुमार नन्नवरे, प्रा.अप्पासाहेब लोंढे, हिलाल पवार व विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा.सत्यजित साळवे यांनी दिली.

**बातमी क्र.२**

जळगाव दि.२५ (      ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विदयापीठाच्या जनसंवाद आणि पत्रकारिता विभागातर्फे दि.३१ जानेवारी २०१९ रोजी एकदिवसीय संशोधन मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा निःशुल्क व खुली असून सामाजिकशास्त्रे प्रशाळेच्या सेमिनार हॉलमध्ये होणार आहे.

या कार्यशाळेचे उद्‌घाटन विदयापीठाचे प्र.- कुलगुरु प्रा.डॉ.पी.पी.माहुलीकर यांच्या हस्ते होणार असून प्रमुख अतिथी म्हणून विदयापीठाचे कुलसचिव बी.बी.पाटील हे उपस्थित राहणार आहेत. तर कार्यशाळेच्या समोराप युआयसीटीचे संचालक तसेच व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा.डॉ.जितेंद्र नाईक यांच्या हस्ते होणार असून प्रमुख अतिथी म्हणून परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील हे उपस्थित राहणार आहेत.

दि.३१ जानेवारी, २०१९ रोजी सकाळी ९.३० ते संध्याकाळी ५.३० या कालावधीत ही कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेत डॉ.मनिषा इंदाणी, डॉ.अनिल चिकाटे, डॉ.अजय पाटील, डॉ.प्रशांत सोनवणे हे मार्गदर्शन करणार आहेत. तरी या संशोधन मार्गदर्शन कार्यशाळेत सामाजिक प्रशाळा, कला व मानव्यविदया प्रशाळा, भाषा प्रशाळा, शिक्षणशास्त्र प्रशाळा, व्यवस्थापनशास्त्रे प्रशाळा, समाजकार्य विभाग, विदयापीठातील इतर प्रशाळा तसेच महाविदयालयातील इच्छुक विदयार्थी यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कार्यशाळेचे आयोजक व समन्वयक प्रा.डॉ.सुधीर भटकर, सहसमन्वयक प्रा.डॉ.विनोद निताळे, विभागप्रमुख डॉ.तुकाराम दौड यांनी केले आहे.

**बातमी क्र.३**

जळगाव दि. २५ (    ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दि. २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने स्वाक्षरी मोहिमेचे आयोजन करण्यात आले. या मोहिमेची सुरुवात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी कुलसचिव भ.भा.पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील, प्रा.अमूलराव बोरसे, विद्यार्थी विकास मंडळाचे माजी प्रभारी संचालक प्रा.एस.टी.इंगळे, प्रा.उमेश गोगडिया, डॉ.संतोष खिराडे, प्रा.हर्षल मंगला हिरामण, प्रा.शरद पाटील, विद्यार्थी यांनी आम्ही आमचे कर्तव्य समजून मतदान करु अशी शपथ घेत स्वाक्षरी नोंदवून पाठिंबा नोंदविला. हा कार्यक्रम महाराष्ट्र निवडणूक आयोग आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या संयुक्त विद्यमाने लोकशाही, निवडणूक आणि सुशासन पंधरवाडा अंतर्गत साजरा केला.

**बातमी क्र.४**

जळगाव दि. २५ (        ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक म्हणून प्रा.सत्यजित साळवे यांनी आज शुक्रवार दि.२५ जानेवारी रोजी पदभार स्वीकारला.

यापूर्वी प्रा.एस.टी.इंगळे हे प्रभारी संचालक म्हणून काम करीत होते. प्रा.साळवे जळगावच्या डॉ.अण्णासाहेब जे.डी.बेंडाळे महिला महाविद्यालयात सहायक प्राध्यापक कार्यरत आहेत. स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून प्रा.साळवे यांनी शहरात काम केले आहे. इ.५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी शालेय स्पर्धा परीक्षेचे लक्ष्य आय.ए.एस.चे आयोजन त्यांनी केले. याशिवाय ११ वी ते पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी जिज्ञासा स्पर्धा परीक्षेचे राज्यस्तरीय आयोजन त्यांनी केले. बार्टीमार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी देखील त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करुन घेतली. स्पर्धा परीक्षांच्या संपादीत ग्रंथांचे लेखन त्यांनी केले आहे. कार्यशाळा, चर्चासत्र यामध्ये त्यांचा सक्रीय सहभाग असतो.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी कल्याणाच्या विविध योजना व उपक्रम समर्थपणे राबविण्याचा संकल्प त्यांनी यावेळी केला. प्रा.साळवे यांनी प्रा.एस.टी.इंगळे यांच्याकडून पदभार स्वीकारला.

---

जा.क्र.कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक:- २५ जानेवारी, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
जनसंपर्क अधिकारी यांच्या करीता